# महाराष्ट्राचा भूगोल

1. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ = ३,०७,७१३ चौ. कि. मी.

2. विस्तार -

पुर्व-पश्चिम जास्तीत जास्त लांबी ८०० कि. मी.

उत्तर-दक्षिण जास्तीत जास्त लांबी ७०० कि.मी. आहे.

3. क्षेत्रफळाच्या बाबतीत महाराष्ट्राचा राजस्थान, मध्यप्रदेशनंतर भारतात तिसरा क्रमांक लागतो. भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी (३२,८७,२६३ चौ. कि.मी.) ९.३६ % इतका हिस्सा महाराष्ट्राने व्यापला आहे.

4. महाराष्ट्राच्या वायव्येस-गुजरात राज्य, दादरा व नगर हवेली, उत्तरेला -मध्य प्रदेश, पूर्वेस - छत्तीसगड, आग्नेयेस - आंध्रप्रदेश, दक्षिणेस - कर्नाटक आणि अगदी दक्षिणेस - गोवा राज्य आहे. राज्याच्या पश्चिम सीमेलगत अरबी महासागर पसरलेला आहे.

5. महाराष्ट्राचे प्राकृतिकदृष्ट्या कोकण किनारपट्टी, सह्याद्री पर्वत किंवा पश्चिम घाट व डोंगराळ प्रदेश, आणि महाराष्ट्र पठार असे ३ प्रमुख विभाग पडतात.

6. अरुंद, चिंचोळ्या कोकण किनारपट्टीचा हा भाग सखल व डोंगराळ आहे.

7. किनारपट्टीस समांतर सह्याद्री पर्वत किंवा पश्चिम घाट आहे.

8. महाराष्ट्राचा पूर्वेकडील बराचसा भाग दख्खन पठाराने व्यापला आहे.

| शिखरे | उंची |
|---|---|
| कळसूबाई | १,६४६ मी. |
| साल्हेर | १,५६७ मी. |
| महाबळेश्र्वर | १,४३८ मी. |
| हरिश्चंद्रगड | १,४२४ मी. |

9. महाराष्ट्र राज्य मोसमी वाऱ्याच्या कक्षेत येत असल्याने महाराष्ट्राचे सर्वसामान्य हवामान मोसमी प्रकारचे आहे. वर्षभराचा विचार करता महाराष्ट्रात हवामानाची स्थिती सारखी नसते.

10. प्रमुख नद्या - गोदावरी, भीमा, कृष्णा, पैनगंगा, वर्धा, वैनगंगा, नर्मदा, तापी, मांजरा, सीना.

11. प्रमुख नद्यांची खोरी: गोदावरी खोरे, भीमा खोरे, कृष्णा खोरे, तापी खोरे, पैनगंगा खोरे, वर्धा खोरे, वैनगंगा खोरे व मांजरा खोरे

| नदीचे नाव | उगमस्थान | .... या जिल्ह्यातून जाते |
|---|---|---|
| गोदावरी | त्र्यंबकेश्वर (नाशिक) | नाशिक, नगर, औरंगाबाद, परभणी, नांदेड |
| भीमा | भीमाशंकर (पुणे) | पुणे, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| कृष्णा | महाबळेश्वर (सातारा) | सातारा, सांगली, कोल्हापूर |
| तापी | सातपुडा पर्वतरांगा (मुलताई), मध्यप्रदेश | अमरावती, अकोला व बुलढाणा, वाशिम, जळगांव, धुळे, नंदुरबार |

12. महाराष्ट्रातील एकूण वनक्षेत्र सुमारे ६१, ९३९ चौ. कि. मी. आहे. भू-क्षेत्राच्या सुमारे २१% क्षेत्र वनाखाली आहे. सर्वात जास्त वनक्षेत्र नागपूर विभागात (२७,५५९ चौ. कि. मी.) आहे. सर्वात कमी वनक्षेत्र औरंगाबाद विभागात (२९१३ चौ. कि. मी.) आहे.
नाशिक विभाग - ११८२१ चौ. कि. मी. वनक्षेत्र.
अमरावती विभाग ९७२२ चौ. कि. मी. वनक्षेत्र.
पुणे विभाग - ६२३७ चौ. कि. मी. वनक्षेत्र.
जिल्ह्यांचा विचार करता राज्यात सर्वात जास्त वनक्षेत्र गडचिरोली जिल्ह्यात (सुमारे १३००० चौ. कि. मी.) आहे.

**13. राज्यातील राष्ट्रीय उद्याने:**
१. ताडोबा राष्ट्रीय उद्यान - चंद्रपूर
२. नवेगाव राष्ट्रीय उद्यान - गोंदिया
३. बोरिवली राष्ट्रीय उद्यान (संजय गांधी राष्ट्रीय उद्यान) मुंबई उपनगर, ठाणे.
याशिवाय नागपूर जिल्ह्यात पेंच आणि अमरावती जिल्ह्यात गुगामल (मेळघाट) ही राष्ट्रीय उद्याने राज्यात आहेत.

**14. प्रमुख अभयारण्ये:**
राधानगरी- दाजीपूर अभयारण्य - कोल्हापूर. (गव्यांसाठी प्रसिद्ध)
चांदोली अभयारण्य - सांगली.
सागरेश्र्वर अभयारण्य - सांगली.
कोयना अभयारण्य - सातारा
माळणी पक्षी अभयारण्य (इंदिरा गांधी पक्षी अभरायरण्य) - सातारा.
भीमाशंकर - पुणे, ठाणे.
तानसा अभयारण्य - ठाणे
कर्नाळा पक्षी अभयारण्य - (महाराष्ट्रातील पहिले पक्षी अभयारण्य) - रायगड
नांदूर मध्मेश्र्वर अभयारण्य - नाशिक (हे अभयारण्य पाणपक्षांसाठी प्रसिद्ध आहे.)
देऊळगाव - रेहेकुरी अभयारण्य - अहमदनगर.
माळढोक पक्षी अभयारण्य - सोलापूर. (राज्यातील सर्वात मोठे अभयारण्य)
गौताळा - औटरम घाट अभयारण्य - औरंगाबाद, जळगाव.
पाल-यावल अभायारण्य - जळगाव
किनवट अभयारण्य - नांदेड, यवतमाळ.
मेळघाट अभयारण्य - (राज्यातील पहिला व्याघ्र प्रकल्प) - अमरावती.
बोर अभयारण्य - वर्धा.
नागझिरा अभयारण्य - गोंदिया

**15. खनिज संपत्ती :**

१. भारतातील मँगेनीजच्या एकूण साठ्यापैकी सुमारे ४०% मँगेनीजचा साठा महाराष्ट्रात आहे. तसेच मँगेनीज उत्पादनात महाराष्ट्राचा भारतात दुसरा क्रमांक लागतो.

जिल्हे - नागपूर, भंडारा, सिंधुदुर्ग.

२. भारतातील बॉक्साईटच्या एकूण उत्पादनापैकी २०% उत्पादन महाराष्ट्रात होते. महाराष्ट्रात जवळ जवळ ८० दशलक्ष टन इतका बॉक्साईटचा साठा आहे. -

जिल्हे - कोल्हापूर, सातारा, सांगली, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.

३. कायनाईट - देशातील कायनाईटच्या एकूण उत्पादनात महाराष्ट्राचा हिस्सा १५% इतका आहे. जिल्हा - भंडारा.

४. क्रोमाईट - देशातील एकूण क्रोमाईटच्या साठ्याच्या १०% इतका साठा महाराष्ट्रात आहे.

जिल्हे - भंडारा, सिंधुदुर्ग, नागपूर.

५. डेलोमाईट - देशातील एकूण साठ्यांपैकी ९% डेलोमाईटचा साठा महाराष्ट्रात आहे. -

जिल्हे - रत्नागिरी, यवतमाळ.

६. चुनखडी - देशातील एकूण चुनखडीच्या साठ्यापैकी ९% साठे महाराष्ट्रात आहेत.

जिल्हे - यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, अहमदनगर.

७. महाराष्ट्रात दगडी कोळशाचा साठा ५,००० दशलक्ष टन आहे. देशाच्या एकूण दगडी कोळशाच्या साठ्याच्या तो ४% इतका आहे.

जिल्हे - नागपूर, चंद्रपूर,

८. भारताच्या एकूण लोहखनिज साठ्यांपैकी २% लोहखनिजसाठा महाराष्ट्रात आहे.

जिल्हे - चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, नागपूर, सिंधुदुर्ग.

९. ग्रॅनाईट - गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, सिंधुदुर्ग जिल्ह्यांत सापडतो.

१०.तांबे - नागपूर व यवतमाळ जिल्ह्यात अत्यल्प प्रमाणात सापडते.

११.अभ्रक - सिंधुदुर्ग जिल्ह्यात सापडते.

१२.टंगस्टन - नागपूर जिल्ह्यात सापडते.

१३.बेसॉल्ट खडक - दक्षिण कोकण व महाराष्ट्राचा अतिपूर्व भाग वगळता महाराष्ट्रात सर्वत्र सापडतो.

16. **खनिज तेल:** मुंबईनजीक समुद्रातील ‘मुंबई हाय’ या क्षेत्रात खनिज तेल, तसेच नैसर्गिक वायू सापडतात. रायगड जिल्ह्यात उरणजवळ समुद्रात खनिज तेलाचे साठे आढळतात.

17. राज्यातील रस्त्यांची एकूण लांबी २,३३,६६४ कि. मी. आहे. (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्ते)

| क्र. | राष्ट्रीय महामार्गाचे नाव | महामार्ग क्रमांक |
|---|---|---|
| १ | मुंबई-नाशिक - आग्रा महामार्ग | ३ |
| २ | मुंबई - पुणे - बेंगळूरू - चेन्नई | ४ |
| ३ | न्हावाशेवा - कळंबोली - पळस्पे | ४ ब |
| ४ | हाजीरा-सुरत-धुळे-नागपूर-कोलकाता | ६ |
| ५ | वाराणसी- नागपूर-हैद्राबाद-बेंगळूरू (कन्याकुमारी | ७ |

| | | |
|---|---|---|
| | महामार्ग) | |
| ६ | मुंबई-अहमदाबाद - जयपूर - दिल्ली | ८ |
| ७ | पुणे - सोलापूर-हैद्राबाद-विजयवाडा | ९ |
| ८ | सोलापूर - विजापूर - चित्रदुर्ग | १३ |
| ९ | निजामाबाद - जगदलपूर | १६ |
| १० | पनवेल - गोवा - मंगलोर | १७ |
| ११ | पुणे - नाशिक ५० | ५० |

18. राज्यातील रेल्वे मार्गाची एकूण लांबी ५९०२ कि.मी. आहे. (कोकण रेल्वे मार्गाची लांबी धरून). राज्यातील प्रमुख **रेल्वे मार्ग**

१. मुंबई - दिल्ली मार्ग (मध्य रेल्वेमार्ग)
२. मुंबई - अहमदाबाद मार्ग (पश्चिम रेल्वेमार्ग)
३. मुंबई - कोलकता मार्ग
४. मुंबई - चेन्नई
५. मुंबई - सिकंदराबाद
६. मुंबई - कोल्हापूर
७. दिल्ली - चेन्नई मार्ग (ग्रॅट - ट्रंक मार्ग)
८. भुसावळ - सुरत

19. मुंबई, पुणे व नागपूर या तीन ठिकाणांहून आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू आहे. आंतरदेशीय विमानतळे - मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर व नांदेड येथे आहेत.

20. महाराष्ट्राला सुमारे ७२० कि. मी. चा सागरी किनारा लाभला आहे. महाराष्ट्रात २ महत्त्वाची बंदरे आहेत
१. मुंबई पोर्ट ट्रस्ट (एम.बी.पी.टी.)
२. न्हावाशेवा (जे. एन. पी. टी./ जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट) तसेच राज्यात ४८ छोटी बंदरे आहेत.

21. राज्यातील पोस्ट सेवेची कार्यालये मार्च, २००७ अखेर १२,५९९ होती. यांपैकी ११,३१५ ही ग्रामीण क्षेत्रात असून उर्वरित १२८४ शहरी क्षेत्रात आहेत.

22. मार्च, २००७ अखेरपर्यंत राज्यात ६४.४४ लाख दूरध्वनी जोड (टेलिफोन कनेक्शन्स)होते.
सप्टेंबर, २००७ अखेरपर्यंत २७९.१४ लाख इतके मोबाईलधारक (भ्रमणध्वनीधारक) होते. त्यापैकी ११५.२५ लाख (४१.३%) हे केवळ मुंबई मंडल मध्ये होते.

23. मुंबई महाराष्ट्राची राजधानी असून नागपूर हे उपराजधानीचे ठिकाण आहे.
सध्या महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हे आहेत आणि ३५८ तालुके व ४३,७२२ खेडी आहेत.
प्रशासकीयदृष्ट्या महाराष्ट्राचे ५ विभाग पडतात. -
१.कोकण, २.पश्चिम महाराष्ट्र, ३.उत्तर महाराष्ट्र, ४. मराठवाडा, ५.विदर्भ.

नागरी प्रशासन व स्थानिक स्वराज्य संस्था :

| तपशील | संख्या |
|---|---|
| १. जिल्हा परिषद | ३३ |
| २. ग्रामपंचायती | २७,९१६ |
| ३. पंचायत समिती | ३५१ |
| ४. महानगरपालिका | २२ |
| ५. नगर परिषद | २२ |
| ६. नगर पंचायत | ०३ |
| ७. कटक मंडळ (कॅन्टॉन्मेंट बोर्ड) | ०७ |

24. लोकसंख्या:

भारतीय जनगणना २००१ नुसार महाराष्ट्राच्या लोकसंख्येची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

| तपशील | संख्या |
|---|---|
| एकूण लोकसंख्या | ९ कोटी ६८ लाख ७८ हजार ६२७ |
| पुरुष | ५ कोटी ३ लाख ९७ हजार ४६० |
| स्त्रिया | ४ कोटी ६४लाख ८१ हजार १६७ |
| ग्रामीण लोकसंख्या (सुमारे) | ५कोटी ५७ लाख ७८ हजार |
| शहरी लोकसंख्या (सुमारे) | ४ कोटी ११ लाख |
| अनुसूचित जाती (एस.सी.) | ९८लाख ८२ हजार |
| अनुसूचित जमाती (एस.टी.) | ८५ लाख ७७ हजार |
| लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि. मी.) | ३१५ |
| एकूण साक्षरता प्रमाण | ७६.९ % |
| पुरुष साक्षरता | ८६.२%, |
| स्त्री साक्षरता | ६९.३% |
| स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया-प्रति हजार पुरुष) | ९२२ |
| नागरी (शहरी) लोकसंख्येचे प्रमाण | ४२.४३% |

(महाराष्ट्राची मार्च, २००८ ची (प्रक्षेपित) लोकसंख्या १० कोटी ८० लाख आहे.)

**थंड हवेची ठिकाणे :**

| | | |
|---|---|---|
| अंबोली - सिंधुदुर्ग जिल्हा, | माथेरान - रायगड, | जव्हार - ठाणे, |
| तोरणमाळ - नंदूरबार, | लोणावळा व खंडाळा - पुणे | महाबळेश्र्वर व पाचगणी- सातारा, |
| पन्हाळा - कोल्हापूर, | चिखलदरा-अमरावती. | नर्नाळा - अकोला |
| भंडारदरा - अहमदनगर, | म्हैसमाळ - औरंगाबाद | |

**प्रमुख धार्मिक पर्यटन स्थळे :**

| धार्मिक पर्यटन स्थळ | जिल्हा |
|---|---|
| पंढरपूर | सोलापूर |
| तुळजापूर | उस्मानाबाद |
| श्री महालक्ष्मी | कोल्हापूर |
| पन्हाळ्याचा जोतिबा | कोल्हापूर |
| अंबेजोगाई | बीड |
| परळी-वैजनाथ | बीड |
| शेगाव | बुलढाणा |
| शिर्डी | अहमदनगर |
| पैठण | औरंगाबाद |
| घृष्णेश्र्वर | औरंगाबाद |
| भीमाशंकर | पुणे |
| देहू व आळंदी | पुणे |
| औंध | सातारा |
| जेजुरी | पुणे |
| वणी | नाशिक |
| त्र्यंबकेश्र्वर | नाशिक |
| औंढ्या नागनाथ | परभणी |
| गुरुद्वारा, | नांदेड |
| महालक्ष्मी व हाजी अली | मुंबई |

**अष्टविनायकाची स्थळे**

| गाव | श्रीगणेशाचे नाव | जिल्हा |
|---|---|---|
| थेऊर | श्रीचिंतामणी | पुणे. |
| रांजणगाव | श्रीमहागणपती | पुणे. |
| मोरगाव | श्रीमोरेश्वर | पुणे. |
| ओझर | श्रीविघ्नेश्वर | पुणे. |
| लेण्याद्री | श्रीगिरिजात्मक | पुणे. |
| महड | श्रीविनायक | रायगड |
| पाली | श्रीबल्लाळेश्वर | रायगड |
| सिद्धटेक | श्रीसिद्धिविनायक | अहमदनगर |

**प्रमुख ऐतिहासिक किल्ले**

| जिल्हा | किल्ल्याचे नाव |
|---|---|
| रायगड | रायगड, कर्नाळा, लिंगाणा, द्रोणागिरी, सुधागड, अवचितगड, सरसगड, तळे, घोसाळे इत्यादी. तसेच सागरी किल्ल्यांमध्ये खांदेरी-उंदेरी, कासा व मुरुड-जंजिरा |
| पुणे | सिंहगड, पुरंदर, शिवनेरी, राजगड, तोरणा, लोहगड इत्यादी |
| सातारा | प्रतापगड, सज्जनगड, कमळगड, मकरंदगड, वसंतगड, केंजळगड, अजिंक्यतारा इत्यादी. |
| कोल्हापूर | पन्हाळा, विशाळगड, गगनगड, भूदरगड इत्यादी. |
| ठाणे | वसईचा भुईकोट किल्ला, अर्नाळा (सागरी), गोरखगड इत्यादी. |
| सिंधुदुर्ग | सिंधुदुर्ग व विजयदुर्ग (सागरी), देवगड, इत्यादी. |
| रत्नागिरी | सुवर्णदुर्ग (सागरी), रत्नगड, जयगड, प्रचितगड इत्यादी. |
| अहमदनगर | हरिश्चंद्रगड, रतनगड व अहमदनगरचा भुईकोट किल्ला. |
| औरंगाबाद | देवगिरी (दौलताबाद) किल्ला. |
| नाशिक | ब्रह्मगिरी, साल्हेर - मुल्हेर इत्यादी. |

**शिल्पे / लेणी :**

अजंठा, वेरूळ, पितळखोरा लेणी - औरंगाबाद जिल्हा.

भाज्याची लेणी, कार्ल्याची लेणी - पुणे जिल्हा.

घारापुरी लेणी-रायगड जिल्हा. खरोसा -लातूर